Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**DR. BAPUJI SALUNKHE INSTITUTE OF ENGINEERING AND TECHNOLOGY (B. Tech.)**

*2130, E WARD, TARABAI PARK, KOLHAPUR. 416 003*

*Telephone: 0231-2658613, email- bsiet.engg@gmail.com, Web: www.bsiet.org*

**Date**: 31th Jan 2025




# अहवाल

## वाचनसंकल्पमहाराष्ट्राचाउपक्रम



***"Vachan Sankalp Maharashtracha Programme"***

**प्रस्तावना**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँड, कोल्हापूर येथे महाराष्ट्र शासनाच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या परिपत्रक क्र**. संकीर्ण-२०२४/ई-९०५२२१/समन्वय, दिनांक २० डिसेंबर २०२४ नुसार "वाचन संकल्प महाराष्ट्राचा**" उपक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वाचन कौशल्ये विकसित करणे आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे हा होता.

**उपक्रमाचे तपशील**

**स्थान:** डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर

**कालावधी:** १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५

**समन्वयक:**

- प्रा. अशोक कोळेकर
- प्रा. सुदर्शन महाडिक
- ग्रंथपाल श्री. महेश देसाई

## उपक्रमातील मुख्य कार्यक्रम

### १. सामूहिक वाचन आणि वाचन कौशल्य कार्यशाळा (०१ जानेवारी २०२५)

- **उद्घाटन:** संस्थेचे संचालक प्राचार्य विरेन भिर्डी, प्राचार्य डॉ. सुहास सपाटे आणि प्रा. अशोक कोळेकर यांच्या हस्ते उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.
- **सामूहिक वाचन:** विद्यार्थ्यांनी शिक्षणमहर्षीडॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रेरणादायी चरित्राचे वाचन केले.
- **वाचन कौशल्य कार्यशाळा:** प्रा. अशोक कोळेकर यांनी वाचनाचे महत्त्व, योग्य वाचन तंत्र आणि वाचनातून होणारे फायदे यावर मार्गदर्शन केले.

**कार्यक्रमाची काही छायाचित्रे:**















Dr. Bapuji Salunkhe Institute of Engineering & Technology
2130 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur



# विवेकानंद कॉलेजमध्ये वाचन संकल्प उपक्रम

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व तरुण पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि त्यांची वाचन कौशल्ये विकसित करणे हा आहे. पंधरवड्यामध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. संस्थेच्या व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक प्राचार्य विरेन भिर्डी, इन्स्टिटयूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे आणि प्रा. अशोक कोळेकर यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आली. वाचनातून घडणाऱ्या सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिकत्वावर भाष्य केले. यावेळी वाचन कौशल्य कार्यशाळा घेण्यात आली, ज्यामध्ये प्रमुख मार्गदर्शक प्रा. अशोक कोळेकर यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व, योग्य वाचन तंत्र, आणि वाचनातून होणारे शैक्षणिक व वैयक्तिक फायदे यावर विस्तृत मार्गदर्शन केले. त्यांनी वाचन कौशल्य वाढविण्यासाठी प्रात्यक्षिकेही सादर केली. ज्यामुळे विद्यार्थ्यांना वाचन कौशल्यांचा सराव करण्यास प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये सामूहिक वाचन सत्र आयोजित करण्यात आले. पदवी आणि पदविका अभियांत्रिकीच्या अनेक विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रा. तन्मय कुलकर्णी, प्रा. सुदर्शन महाडिक यांनी आयोजन केले. या उपक्रमासाठी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रंथपाल महेश देसाई यांनी आभार मानले.

तरुण भारत-३-२-२०२५

**कार्यक्रमाचा व्हिडीओ/बातमीची लिंक:**

https://www.facebook.com/BSIET6468/videos/962270938634631/?rdid=Cl1VbPX8f6Js83a5#

## २. ग्रंथ प्रदर्शन (०३ जानेवारी २०२५)

- **उद्घाटन:** श्री. गौरव गावडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून ग्रंथ प्रदर्शनाची सुरुवात करण्यात आली.
- **प्रदर्शनातील ग्रंथ:** शैक्षणिक, साहित्यिक आणि तांत्रिक विषयांवरील ग्रंथांचा समावेश करण्यात आला.
- **सहभाग:** विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

## कार्यक्रमाची काही छायाचित्रे:




## कार्यक्रमाचा व्हिडीओ/बातमीची लिंक:

https://smpnewsnetwork.com/Spontaneous-response-to-book-exhibition-

https://www.facebook.com/reel/1134232275114336

https://www.facebook.com/reel/619743780400245

Dr. Bapuji Salunkhe Institute of Engineering & Technology
2130 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur

## ३. वाचन संवाद - लेखक-विद्यार्थी संवाद (०९ जानेवारी २०२५)

- **मुख्य वक्ते:** प्रा. डॉ. हिमांशू भूषण स्मार्त
- **संवादातील विषय:** साहित्यनिर्मितीतील आव्हाने, वाचनसंस्कृतीचे भवितव्य आणि वाचन-लेखन प्रवाहावरील बदल.
- **सहभाग:** विद्यार्थ्यांनी लेखकांशी उत्स्फूर्त संवाद साधला.

**कार्यक्रमाची काही छायाचित्रे:**












Dr. Bapuji Salunkhe Institute of Engineering & Technology
2130 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur





**कार्यक्रमाचा व्हिडीओ/बातमीची लिंक:**

**https://www.facebook.com/reel/1151966089656837**

## ४. ग्रंथालय स्वच्छता मोहीम (१० जानेवारी २०२५)

- **सहभागी:** शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी
- **कार्य:** ग्रंथालयातील पुस्तके व्यवस्थित करणे, स्वच्छता करणे.
- **कार्यक्रमाची काही छायाचित्रे:**



















Dr. Bapuji Salunkhe Institute of Engineering & Technology
2130 'E' Ward,
Tarabai Park,
Kolhapur

## ५. पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धा (१६ जानेवारी २०२५)

- **स्पर्धा:** विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण आणि कथन स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला.
- **स्पर्धेचे परीक्षक:** प्रा. अशोक कोळेकर, प्रा. सुदर्शन महाडिक, प्रा. तन्मय कुलकर्णी आणि प्रा.सुरज गायकवाड.

**कार्यक्रमाची काही छायाचित्रे:**



## ६. पारितोषिक वितरण समारंभ (२६  जानेवारी २०२५)

- **पारितोषिके:** विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.
- **उपस्थिती:** संचालक प्राचार्य विरेन भिर्डी, प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, शिक्षक आणि विद्यार्थी.

**कार्यक्रमाची काही छायाचित्रे:**




2130 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur

# ‘बापूजी साळुंखे ’मध्ये ‘वाचन संकल्प’

**कोल्हापूर :** डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये महाराष्ट्र शासन निर्देशित ‘ वाचन संकल्प महाराष्ट्राचा ‘ या उपक्रमाचा यशस्वी समारोप झाला. या उपक्रमांतर्गत पार पडलेल्या सामूहिक वाचन, पुस्तक परीक्षण स्पर्धा, कथन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ झाला. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेच्या व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक प्राचार्य विरेन भिर्डी, इन्स्टिट्यूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांच्या हस्ते बक्षिसे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. लेखक आणि नाटककार डॉ. हिमांशू स्मार्त यांनी लेखकाच्या जडणघडणीची प्रक्रिया सांगितली. यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. यासाठी समन्वयक प्रा. सुदर्शन महाडिक, प्रा. अशोक कोळेकर, ग्रंथपाल महेश देसाई आणि समितीने परिश्रम घेतले.

**दैनिक तरुण भारत, 31 जानेवारी 2025**

**कार्यक्रमाचा व्हिडीओ/बातमीची लिंक:**

https://maharashtranews1.com/Reading-Resolution-Initiative-at-Dr--Bapuji-Salunkhe-Engineering-Institute

## निष्कर्ष

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रम यशस्वीपणे पार पडला. "वाचाल तर वाचाल" या सुविचाराचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व आणि त्याचे आयुष्यातील उपयुक्तता समजली. दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी पारितोषिक वितरण समारंभाने या उपक्रमाचा यशस्वी समारोप झाला. 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि अंमलबजावणी समन्वयक प्रा. अशोक कोळेकर, प्रा. सुदर्शन महाडिक, ग्रंथपाल प्रा. महेश देसाई यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. त्यांच्यासोबत ग्रंथालय समिती व कर्मचारी यांनी या उपक्रमासाठी अतिशय परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोहोचवणे, त्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे, तसेच विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांच्या या समर्पित योगदानामुळेच 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली.हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ वाचन संस्कृतीला चालना देणारा नव्हता, तर त्यांच्यातील सर्जनशीलता, वैचारिक क्षमता आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठीही प्रेरणादायी ठरला. विद्यार्थ्यांना या स्पर्धांमधून वाचनाच्या नवीन वाटा उलगडल्या आणि त्यांनी पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानसंपादनाचे महत्त्व जाणून घेतले. या उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या परिसरात एक सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण तयार झाले. भविष्यात असे अनेक उपक्रम राबवले जातील, जे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक विकासाला चालना देतील. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिवा प्रा. शुभांगी गावडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी झाला.

**दिनांक:** ३१ जानेवारी २०२५

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रा.अशोक कोळेकर** | **प्रा. महेश देसाई** | **डॉ. सुहास सपाटे,** | **प्रा. विरेन भिर्डी** |
| समन्वयक | ग्रंथपाल | प्राचार्य | संचालक |

Dr. Bapuji Salunkhe Institute of Engineering & Technology, 2130 'E' Ward, Tarabai Park, Kolhapur



12 | Page